महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
ठाकरसी हाऊस, मुंबई पोर्ट ट्रस्ट, ३ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०३६ E-mail : ad.admin@mahakosh.in

क्र. संलेको-०९-२०१९/प्रशा-राप-सलेअ/टिस-१/न.क्र.११३/सेवानिवृत्ती आदेश/जुलै ते डिसेंबर २०१९/ 78

दिनांक 27 JAN 2019

विषय : महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीबाबत.
(माहे जुलै २०१९ ते डिसेंबर २०१९)

:- आदेश -:

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील खालील अधिकारी माहे जुलै २०१९ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकास शासकीय सेवेतून नियतवयमानुसार सेवानिवृत्त होणार आहेत.

| अ. क्र. | नाव<br>पदनाम व सध्याचे कार्यालय | जन्मदिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. सुरेश शंकर जाधव<br>**सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी**<br>सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, रत्नागिरी | ०२ ऑगस्ट १९६१ | ३१ ऑगस्ट २०१९ |
| २ | श्री. अरविंद कुंडलिकराव लहासे<br>**सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी**<br>सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, औरंगाबाद | ०२ ऑक्टोबर १९६१ | ३१ ऑक्टोबर २०१९ |
| ३ | श्री. अगस्ती दाजीबा मेश्राम<br>**सहाय्यक लेखा अधिकारी**<br>जिल्हा पुरवठा कार्यालय, गोंदिया | २५ ऑक्टोबर १९६१ | ३१ ऑक्टोबर २०१९ |
| ४ | श्री. हरिशचंद्र च. ढाके<br>**सहाय्यक लेखा अधिकारी**<br>वित्तीय सल्लागार तथा उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे कार्यालय, मुंबई शहर | ०१ नोव्हेंबर १९६१ | ३१ ऑक्टोबर २०१९ |
| ५ | श्रीमती शर्मिला आल्हाद मयेकर<br>**उपकोषागार अधिकारी**<br>कोषागार कार्यालय, रत्नागिरी | १८ नोव्हेंबर १९६१ | ३० नोव्हेंबर २०१९ |

सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर प्रत अधिकृत समजण्यात यावी.

कार्यालय प्रमुखांनी वरील अधिका-यांना त्यांच्या नियतवयमान सेवानिवृत्तीच्या दिनांकास स्थानिक व्यवस्था करुन सेवामुक्त करावे व तसे केल्याचे या संचालनालयास कळवावे.

(ज.र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत सविनय सादर-

1. अवर सचिव, वित्त विभाग, कोषा प्रशा-३, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
2. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.

/- यांनी सदरच्या अधिकाऱ्यांचे विहित नमुन्यातील ना मागणी ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र संचालनालयास त्वरित सादर करावे.

Scanned by CamScanner

प्रत अग्रेषित-

1. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, ६ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
2. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
3. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय (सर्व)

या आदेशान्वये सेवानिवृत्त होणारे अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात कार्यरत असतील तर त्यांना या आदेशाची प्रत देण्यात यावी.

प्रत-

1. संबंधित अधिकारी / संबंधित कार्यालये.
   /- यांना कळविण्यात येते की, गट विमा योजनेचे सभासद झाल्याबाबतची नोंद व वेळोवेळी वाढीव दराने गट विमा योजना वर्गणी कपात केल्याबाबतची नोंद संबंधित कार्यालयाने सेवापुस्तकात केली आहे वा कसे याची खातर जमा करावी. तसेच महालेखापाल कार्यालयाने ठेवलेला सेवा विषयक (१ एप्रिल १९८९ पूर्वीचा) तपशिल सेवापुस्तकात दाखल/ नोंद आहे वा कसे याचीही खातर जमा करुन घ्यावी. प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील निवृत्ती वेतन वर जावेत न अंशदाने महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन इ.) १९८१ नियम ४४ अ नुसार राज्याच्या एकत्रित निधी मध्ये जमा झाल्याबाबत स्वत: खात्री करावी. रजावेतन/ निवृत्तीवेतन अंशदानाच्या रकमा भरणा केल्याचा तपशिल संचालनालयास पाठविला नसल्यास त्वरित पाठवावा, जेणेकरुन महालेखापाल कार्यालयाकडून "नादेय" प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करता येईल आणि निवृत्तीनंतरचे अनुज्ञेय लाभ प्रदान करताना अडचणी येणार नाहीत.
2. उप संचालक (प्रशासन) मुख्यालय, मुंबई. यांना शासकीय येणे प्रमाणपत्र संदर्भात कार्यवाहीसाठी (अर्थसंकल्प शाखा)
   /- यांनी सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांनी घरबांधणी / वाहन / वैयक्तिक संगणक खरेदी इ. साठी अग्रिम घेतले आहे किंवा कसे ? याबाबतचे सद्यस्थितीतील अभिप्राय प्रशासन सलेअ-राजपत्रित शाखेस त्वरित देण्यात यावेत.
3. सहाय्यक संचालक (विभागीय चौकशी शाखा), मुख्यालय, मुंबई यांना ना विभागीय चौकशी प्रमाणपत्रा संदर्भात कार्यवाहीसाठी.
   /- यांनी सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांच्या विरुध्द संचालनालयाच्या स्तरावरुन विभागीय चौकशी / न्यायालयीन प्रकरण / फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे ? याबाबतचे अभिप्राय प्रशासन सलेअ-राजपत्रित शाखेस त्वरित देण्यात यावेत.

Scanned by CamScanner